Lok Mahavidyalaya Wardha
Session 2018-19

Study Material
Class M.A. II (Eco) Sem III
Subject : Economic Growth and Development

# आर्थिक विकासाचा अर्थ व आर्थिक विकासाचे निर्देशक

आधुनिक काळात जागतिक महामंदीचा त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुध्दाचा परिणाम म्हणून जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडून पडल्या. इतकेच नव्हे तर काही देशांच्या अर्थव्यवस्था पूर्णपणे उध्वस्त झाल्या या मधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक देशाला विकासाची आवश्यकता निर्माण झाली आणि त्यातूनच विकासाचे अर्थशास्त्र ही स्वंतत्र शाखा तयार झाली.

१९५० च्या नंतर आर्थिक विकास या सकंल्पनेला विशेष महत्व प्राप्त झालेले आहेत. मागासलेल्या व अल्पविकसीत देशांच्या दृष्टीकोनातून आपल्या आर्थिक विकास करण्याची मुख्य जबाबदारी असते. प्रो.हिगिन्स , प्रो.यंगसन , प्रो.सायमन कुझनेटस् प्रा.मायर आणि बाल्डविन, लोवीस अशा अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकासाची व्याख्या केलेली आहे. त्यापैकी मायर बाल्डविन आणि लेव्हिस यांची व्याख्या अधिक उपयुक्त आहेत.

## आर्थिक विकासाचा अर्थ

**१) प्रा.मायर आणि बाल्डविन :-**

"आर्थिक विकास ही अशी एक प्रक्रिया की ज्याद्वारे देशाच्या वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात दीर्घकाळपर्यत वाढ होते". या व्याख्येवरुन आर्थिक विकासाची ठळक तीन वैशिष्टये दिसून येतात.

१) आर्थिक विकास ही एक प्रक्रिया आहे.

२) आर्थिक विकासामध्ये देशाच्या वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

३) आर्थिक विकास ही दीर्घकाळीन चालणारी प्रक्रिया असते.

**२) प्रो.लेव्हिस :-**

"देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होणे म्हणजे आर्थिक विकास होय. "

प्रो.लेव्हीस यांनी दरडोई उत्पन्नाला आपल्या व्याख्येमध्ये महत्व दिलेले आहे.

**आर्थिक विकासाचे निर्देशक :-**

परंपरागत काळापासून आधुनिक अर्थशास्त्रज्ञापर्यंत वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास

मोजमापाचे वेगवेगळे निर्देशक सांगितलेले आहेत. यामध्ये आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी सांगितलेले निर्देशांक पुढीलप्रमाणे ोहत.

**१) वास्तविक राष्ट्रीय उत्पन्नात वाढ :-**

प्रा.मायर आणि बाल्डविन , प्रा.कुझनेटस् यांच्या मते वास्तविक राष्ट्रीय उत्पनात होणारी वाढ हा आर्थिक विकासाचा सर्वश्रेष्ठ मापदंड आहे. वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे देशातील विशीष्ट काळात उत्पादीत झालेल्या वस्तू व सेवांचे शुध्द उत्पादन होय. त्यामुळे किंमत झालेल्या बदलांचा यामध्ये समावेश होत नाही. त्याचप्रमाणे लोकसंख्येतील बदलांचा विचारही येथे होत नाही.

**२) दरडोई उत्पन्नात वाढ :-**

अल्पविकसीत देशात राष्ट्रीय उत्पन्नाबरोबर दरडोई उत्पन्नाला देखील महत्व आहे. याचे कारण अल्पविकसीत देसांची मुख्य समस्या राहणीमानाच्या सुधारणेशी संबंधीत असते. राहणामानीच्या सुधारणेशी संबंधीत असतो. राहणीमानाचा संबंध दरडोई उत्पन्नाशी असतो. म्हणूनच निर्देशक मानले आहे. त्यांच्या मते एखाद्या देशाच्या वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर अवलंबून असतो.

**३) आर्थिक कल्याणात वृध्दी -**

ज्या प्रक्रियेने दरडोई वास्तविक उत्पन्न वाढत असेल आणि त्याचवेळी उत्पादनातील विषमता कमी होत असेल म्हणजेच आर्थिक कल्याणात वृध्दी होत असेल तेथे विकास होतो असे मानले जाते.

**४) जिवनमान निर्देशांक :-**

राहणीमानाचा स्तर प्रामुख्याने उपभोगाच्या स्तरावर अवंलबून असतो. त्यामुळे देशात वाढता उपभोग व राहणीमानाच स्तर आर्थिक विकासाची दिशा स्पष्ट करु शकते.

यामध्ये एका देशांच्या लोकांची सरासरी आय मर्यादा, साक्षरता, बालमृत्यूचे प्रमाण इत्यादी घटक विचारात घेऊन जिवनमानातील वाढ व आर्थिक विकासाचे मोजमाप केले जाते. या दृष्टीने अमेरिकेतील ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सील या संस्थेत कार्यरत असणाऱ्या मॉरीस डी.मॉरीस यांनी जीवनमानाच्या भौतीक गुणवत्ता निर्देशांक तयार करुन आर्थिक विकासाचे अनुमान लावावे लागले जातात.

**५) मुलभूत गरजांचा निर्देशांक -**

ज्या देशांचा अत्यंत कमी प्रमाणात विकास झाला आहे. त्यांना दारिद्रय, बेकारी आणि विषमतेसारख्या गंभीर समस्यांना तोंड दयावे लागते. तेव्हा सर्वसामान्य जनतेला मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या गुंतागुंतीत त्यांचे इतर प्रश्नही अडकले असतात. या निर्देशांकात उपभोग, आरोग्य व स्वच्चता, निवास व्यवस्था, शिक्षण, वाहतुक इत्यादी घटकांना विचारात घेतले जाते.

**६) मानवी विकास निर्देशांक -**

विकासाचा सर्वमान्य निर्देशांक विकसीत करण्याच्या उद्देशाने युएनडी.पी मध्ये कार्यरत प्रसिध्द पाकिस्तानी अर्थशास्त्रज्ञ प्रा.मेहबुब-उल-हक यांच्या मतावर आधारित मानव विकास निर्देशांक १९९० च्या दशकात विकसीत करण्यात आला. या निर्देशांकाच्या अहवालात उल्लेख केल गेला की, मानवी विकास अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये सर्व सामान्य लोकांच्या पसंतीद्वारे त्यांच्या कल्याणाचा वरचा स्तर प्राप्त केला जातो.

**७) शिक्षण आरोग्य व पौष्टीक आहार -**

आर्थिक विकासासाठी शिक्षण, आरोग्य, पौष्टीक आहार, इत्यादी सुविधा सुध्दा आवश्यक असतात,, शिक्षणामुळे लोकांचा अंधविश्वास समाप्त होतो. लोकांचा दृष्टीकोन व प्रगतीशील बनतो, शिक्षणामुळेच लोकंसंख्येवर नियंत्रण ठेवणे शक्य होते. लोकांचा नवीन तंत्रज्ञानाचा वापरही करता येतो.

अशाप्रकारे आर्थिक विकास मोजमापाचे अनेक निर्देशक आहेत. सर्व निर्देशकांमध्ये कोणते ना कोणते दोष आहेतच, त्यामुळे प्रत्येक देश आपआपल्या विकास पध्दतीनुसार आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी योग्य असा निर्देशक वापरु शकतात.